मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२३। पान १

# पिंपरी- चिंचवडमधील 'हे' नेत्र रुग्णालय ठरतंय आशादायी!

## पिंपरी- चिंचवड रुग्णालयात परराज्यांतून येत आहेत रुग्ण

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महानगर पालिकेच्या शंकरराव मासुळकर अर्बन हेल्थ सेंटर आणि आय नेत्र हॉस्पिटलमध्ये अनेक महत्त्वाच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. महाराष्ट्र राज्यासह परराज्यांतून या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्ण येत आहेत. अवघ्या कमी कालावधीत हे नेत्र रुग्णालय अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावत आहे. असं असलं तरी अद्यापही अद्यावत सुविधा उपलब्ध नसल्याचं समोर आल आहे. सर्जन डॉक्टरांची आणखी एक टीम त्या ठिकाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासंबंधी




लवकरच आम्ही प्रयत्न करणार आहोत अशी माहिती वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांनी लोकसत्ता ऑनलाईन शी बोलताना दिली आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मासुळकर कॉलनी या ठिकाणी नेत्र रुग्णालय सुरू करण्यात आले आहे. या रुग्णालयात काच बिंदू, तिरळेपण, पापण्यांचे आजार, डोळ्यावरील पडदा यावरील उपचार केले जात आहेत. दररोज १५ रुग्णांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया केली जात आहे. दरम्यान, या रुग्णालयात तीन सर्जन डॉक्टर आहेत. डॉ. रूपाली महेशगौरी, डॉ. महेश टिकेकर आणि डॉ. प्राची बाकरे हे तिघेही मास्टर ऑफ सर्जन आणि उच्चशिक्षित असलेले डॉक्टर्स आहेत असं असलं तरी आणखी तीन जणांची टीम या रुग्णालयात असणं गरजेचं आहे. जेणेकरून दररोज १५ पेक्षा अधिक रुग्णांच्या डोळ्यांची सर्जरी केली जाऊ शकते. डोळ्यांच्या मागच्या पडद्याच्या म्हणजेच रेटीनाचे आजाराचे निदान या रुग्णालयात होते, परंतु उपचार घेण्यासाठी रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. नेत्र रुग्णालयात दररोज २०० ते २५० रुग्ण तपासणीसाठी येतात. त्यामुळे रुग्णांची गर्दी होत आहे. टोकणचे दोन काउंटर असणे गरजेचे आहे. सध्या तिथे एकच काउंटर सुरू आहे. रुग्णालयात दिशा फलक आणि सूचना फलक नाहीत. रुग्ण अत्यावस्थेत असल्यास त्याला ऑक्सिजन सिलेंडरचा सेटअप नाही. त्यामुळे रुग्णाच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो अशी स्थिती या रुग्णालयाची आहे. रुग्णालयात अद्यावत अशा मशिनरी येणे अपेक्षित आहे. ग्रीन लेझर, विट्रोटॉमी, बायोमायक्रोस्कोप, क्रायोयुनिट, बी – स्कॅन मशीन (डोळ्याचे सोनिग्राफी मशीन) या अद्यावत मशीन आणि अद्यावत डॉक्टरांची गरज या नेत्र रुग्णालयाला आहे. कमी कालावधीत हे रुग्णालय नेत्र रुग्णांसाठी आशादायी ठरत आहे. परंतु, यात आणखी लक्ष देऊन नेत्र रुग्णालयाला काय नको? काय हवं! हे पाहणं महानगर पालिकेचे कर्तव्य आहे.

# सई तापकीर महाराष्ट्राची सौंदर्यवती पर्व ८ च्या मानकरी

## लॉलीपॉप इंटरटेनमेंट यांचा महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा उपक्रम

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महिलांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम पिंपरी चिंचवड शहरातील लॉलीपॉप एंटरटेनमेंट आणि कॅलिस्टा पिजंट या संस्थेच्या वतीने करण्यात येते. या संस्थांच्या वतीने महाराष्ट्राची सौंदर्यवती स्पर्धा २०२३ पर्व ८ अंतर्गत महिलांच्या खुल्या गटाच्या आणि लहान मुले आणि मुलींच्या सौंदर्य स्पर्धा रविवारी चिंचवड येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या सौंदर्य स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून सौंदर्यवतींनी सहभाग घेतला होता.या स्पर्धेत झालेल्या विविध फेऱ्यांमध्ये सई तापकीर या प्रथम क्रमांक मिळवित महाराष्ट्राची सौंदर्यवती स्पर्धा २०२३ चा मुकुट आणि रोख पंधरा हजार रुपयांचे बक्षीसाच्या मानकरी ठरल्या. नेहा निकाळजे द्वितीय क्रमांक मुकुट आणि रोख बारा हजार रुपये, तृतीय क्रमांक सानिका जवंजाळ यांनी मुकुट आणि रोख दहा हजार रुपयांचे बक्षीस पटकावले. विजेत्या स्पर्धकांना ज्येष्ठ कर सल्लागार शाळिग्राम तायडे प्रा. विजय रामाने यांच्या हस्ते सोन्याची नथ, पैठणी आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. लहान मुलांच्या गटात प्रथम क्रमांक अंशिका कदम, द्वितीय क्रमांक अनविका मोरे आणि तृतीय क्रमांक अनिकेत साळुंखे यांनी मिळवला. सर्व विजेत्यांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नैना वेदपाठक, डॉ. दुर्गा लकडे, सुहास ढवळे आणि प्रा. सूमीता काटकार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तर ग्रूमिंग नरेश फुलेलू , क्षितिज गायकवाड आणि इशा राजे यांनी केली. आऊटफिट तृप्ती पवार, वेशभूषा, केशरचना रिया आदमाने आणि प्रिया कानडे यांनी केली. शिल्पा मगरे-गाडेकर, निकिता गायकवाड आणि प्रीती वाघमारे यांनी संयोजनात सहभाग घेतला.

# मावळात लोकसभा उमेदवारीवरून युतीत रंगला महाकलगीतुरा!

## श्रीरंग बारणे यांनी आपल्या नऊ वर्षाच्या कामाचा हिशोब जनतेला द्यावा

**तळेगाव दाभाडे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** खासदार बारणे यांनी तिसऱ्यांदा उमेदवारी मागण्यापूर्वी आपल्या नऊ वर्षांच्या कामाचा लेखाजोखा द्यावा. मावळ तालुक्यात काय कामे आणली, कोणत्या मोठ्या योजना आणल्या, किती निधी आणला? हे जनतेसमोर मांडावे, असे आव्हान देत आमदार सुनील शेळकेंनी अप्रत्यक्ष श्रीरंग बारणेंच्या उमेदवारीला विरोधच केला. मोदी लाटेवर उमेदवारी मागणे आणि निवडून येणे आता सोपे राहिलेले नाही, असे सांगत त्यांनी बारणेंना डिवचले. तसेच दोन्ही टर्मला ते मोदी करिष्म्यामुळे निवडून आले, हे त्यांनी आवर्जून सांगितले. मावळ तालुक्यातील विविध विकास कामांबाबत, राजकीय घडामोडी, आगामी लोकसभा निवडणुकीबाबत ज्या काही चर्चा, तर्क-वितर्क लढवले जात आहेत, याची माहिती, तसेच तालुक्यात सुरू असलेल्या महत्त्वकांक्षी प्रकल्पांचे अपडेट, सध्या या कामांचा तपशील मावळवासियांना माहिती व्हावा. तसेच स्थानिक नागरिकांचे प्रश्न, तळेगाव, लोणावळा, देहू, कँन्टोन्मेंट बोर्डासंधर्भातील प्रश्न तसेच तळेगाव शहरातील अंतर्गत रस्त्यांची १६ कोटी रुपयांची प्रस्तावित कामे सुरू करण्याबाबतची माहिती आ. शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच मावळ



तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील यांना आवाहन करण्यात आले. आमदारकीचा जो काही कार्यकाळ शिल्लक आहे. या कार्यकाळात जी काही आश्वासने दिली होती ही आश्वासने या १० महिन्याच्या कालावधीत मार्गी लावण्यात येतील. आपापल्या गावातील अर्धवट विकासकामांची माहिती द्यावी. जी काही कामे शिल्लक आहेत ती १०० टक्के पूर्णत्वास नेण्यासाठी आमचा प्रयत्न असणार आहे. याबाबत सविस्तर माहिती देण्याच्या हेतूने मावळचे आमदार सुनील आण्णा शेळके यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. शिवसेना शिंदे गटाचे मावळचे दोन टर्मचे खासदार श्रीरंग बारणे यांनी हॅट्रिकसाठी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीला महायुतीकडून आपली उमेदवारी अगोदरच जाहीर केली आहे. त्यानंतर तेथून माजी मंत्री भाजपचे बाळा भेगडे यांनीही सोमवारी (ता.२७) शड्डू ठोकत लढण्याची तयारी दाखवली, तर आज (ता.२८) राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) या जागेवर दावा केला आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीला सहा महिन्यांचा वेळ असताना तसेच ती जाहीर झालेली नसतानाही मावळात उमेदवारीवरून युतीत महाकलगीतुरा रंगला आहे. युतीतील तिन्ही पक्षांनी मावळवर क्लेम केल्याने तेथील २०२४ च्या लोकसभेच्या उमेदवारीचा मोठा पेच २०२३ लाच निर्माण झाला आहे. अजित पवार राष्ट्रवादी गटाचे मावळचे आमदार सुनील शेळके यांनी आज पत्रकार परिषद घेत ही जागा पक्षाला मिळाली पाहिजे, अशी मागणी केली. या मतदारसंघात पक्षाची मोठी ताकद असल्याने ती मिळावी म्हणून आठ दिवसांत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह युतीच्या नेत्यांपुढे ही मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचवेळी मी इथे (विधानसभेला) समाधानी असून, लोकसभा लढणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.श्रीरंग बारणेंनी अगोदरच आपली उमेदवारी जाहीर करून टाकली आहे, याकडे आमदार शेळके यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना आ. शेळके म्हणाले की, उमेदवारी मिळाली म्हणजे निवडून आलो असे होत नाही.

# भव्य किल्ले बनवा स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न

## प्रयत्न सोशल फाऊंडेशने केले होते स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रयत्न सोशल फाऊंडेशन आयोजित भव्य किल्ले बनवा स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न झाला. प्राधिकरण येथील संत तुकाराम महाराज उद्यान या ठिकाणी रविवार दि.२६ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी सात वाजता हा कार्यक्रम पार पडला.

अध्यक्ष कु.अजय अनिलराव मोरे यांनी प्रमुख पाहुणे 'शेर शिवराज आणि सुभेदार' चित्रपटाचे निर्माते प्रद्योतजी




पेंढारकर आणि लोकमान्य हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर जयवंतजी श्रीखंडे तसेच शिवव्याख्याते नरेंद्रजी पेंडसे यांचे स्वागत व सत्कार केला. त्यानंतर फाऊंडेशनच्या माहिती पुस्तकाचे प्रकाशन केले. यावेळी माजी नगरसेवक अमित गावडे, अतुल इनामदार, माजी नगरसेविका शर्मिलाताई बाबर, सरिताताई साने, कैलास जायगुडे, अनिल मोरे, नवनाथ साखोरे उपस्थित होते. किल्ले बनवा स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या १२७ गटांपैकी दहा उत्कृष्ट गटांना पारितोषिक देण्यात आली. तसेच तृतीय क्रमांक आदित्य पटवर्धन (राजमुद्रा ग्रुप, रायगड) द्वितीय क्रमांक आदित्य वाडकर (टिळक मित्र मंडळ, विशाळगड) प्रथम क्रमांक तन्मय खांबे (कोरोमंट गणेश मित्र मंडळ, राजगड) अशा सर्व विजेत्यांना या वेळी पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. फाऊंडेशनचे सचिव राजीव मेनेन यांनी पुढील वर्षातील नियोजित कार्यांची माहिती दिली. शेवटी फाऊंडेशनचे उत्सव/कार्यक्रम प्रमुख जयेश मोरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व शिववंदनने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तीन डिसेंबरनंतर राज्यात दंगल!

## भुजबळांना तुरुंगातून बाहेर काढलं : प्रकाश आंबेडकर



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यात अनेक ठिकाणी दंगलग्रस्त परिस्थिती आहे. तीन डिसेंबरनंतर राज्यात दंगलीची मोठी शक्यता आहे. पोलीस ठाण्यांना सतर्कतेची सूचनाही देण्यात आली आहे. चार राज्यांतील विधानसभा निवडणुका झाल्यानंतर काहीही होऊ शकते, असे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर मंगळवारी पत्रकार परिषदेत म्हणाले. महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त फुले वाड्यात येऊन आंबेडकर यांनी अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. देशात मुस्लिम आणि ओबीसी समाजाला लक्ष्य केले जात आहे. समाजात अशांतता निर्माण केली जात असून आंदोलनाशी संबंध नसलेल्यांचा त्यासाठी वापर केला जात आहे, असा आरोप करतानाच आगामी लोकसभा निवडणुकीनंतर नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असा दावाही आंबेडकर यांनी केला. ते म्हणाले की, तीन दिवसांपूर्वी मुस्लिम संघटनांची मुंबई येथे बैठक झाली. मुस्लिम संघटना आठ डिसेंबर रोजी पॅलेस्टाईन या विषयावर सभा घेणार आहेत. मुस्लिम समाजाची सभा असल्याने भाजप त्याकडे वेगळ्या नजरेने पहात आहे. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना कारागृहातून मीच बाहेर काढले. मात्र, त्यांनी त्याबाबत माझे कधी आभार मानले नाहीत. मलाही कोणाची गरज नाही. मंडल आयोगाचा इतिहास पाहिल्यावर वस्तुस्थिती कळेल. इतिहास पाहिला तर मीच ओबीसीचा जनक असल्याचे दिसेल, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी दोन वर्ष तुरुंगवास भोगला आहे. दिल्लीतलं महाराष्ट्र सदन बांधताना मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी न्यायालयाने १४ मार्च २०१६ रोजी भुजबळ यांची तुरुंगात रवानगी केली होती. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी मुंबईच्या आर्थर रोड तुरुंगात काढली. तुरुंगात असताना त्यांची प्रकृती खालावली होती. त्यानंतर काही महिने त्यांच्यावर मुंबईच्या केईएम रुग्णालयात उपचार करण्यात आले. याचदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला. त्यानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन भुजबळ घरी परतले. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी दावा केला आहे की, त्यांनीच भुजबळांना तुरुंगाबाहेर काढलं. प्रकाश आंबेडकर मंगळवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रकाश आंबेडकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यातल्या फुले वाड्यात जाऊन त्यांना अभिवादन केलं. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बातचीत केली. यावेळी ओबीसी आरक्षणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, छगन भुजबळांची भूमिका मंडल आयोगाच्या विरोधात होती. म्हणून मी तुम्हाला (पत्रकार) सांगतोय की आधी इतिहास शोधा आणि तो लोकांसमोर आणा. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले, ते न्यायाधीश त्यावेळी भुजबळांना तुरुंगाबाहेर सोडत नव्हते. न्यायपालिका त्यांचा जामीन नाकारत होती. त्यावेळी मीच उलटा वार केला होता. न्यायपालिका जर व्यवस्थित वागली नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया नंतरही भुजबळांबद्दलचा निर्णय घेतला नाही तर संबंधित न्यायाधीशावर खटला चालवता येऊ शकतो, हे लक्षात घ्यावं असं मीच बजावलं होतं. त्याच्या पुढच्या दिवशी भुजबळांना सोडून देण्यात आलं.

### शिव्या घातल्या नसत्या तर

**» प्रकाश आंबेडकर यांच्या संविधान सन्मान महासभेतील वक्तव्यानंतर छगन भुजबळ प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की माझी प्रकाश आंबेडकरांबद्दल नाराजी नाही. त्यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, माझीही त्यांच्याबद्दल नाराजी नाही. उलट त्यांना तुरुंगातून बाहेर काढणारा मीच आहे. मी त्या न्यायाधीशाला शिव्या घातल्या नसत्या तर आज छगन भुजबळ तुरुंगातून बाहेर आले नसते. माझी भुजबळांवर नाराजी असती तर मी सार्वजनिकरित्या त्या न्यायाधीशाला (सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर भुजबळांना तुरुंगातून सोडून देण्याबाबतचा निर्णय घेण्यास दिरंगाई करणारे न्यायाधीश) शिव्या घातल्या नसत्या.**

# काही पिकांसाठी हसू तर काहीसाठी आंसू

## अवकाळी पावसाचा भात पिकाला झटका

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** अवकाळी पावसाने खरीप हंगामातील काढणीस आलेल्या भात पिकाला झटका बसला आणि भात खाचरांत पेरणी केलेल्या पिकांचे नुकसान झाले, तर रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा आणि गहू पिकाला जीवदान मिळाल्याने हा पाऊस म्हणजे आनंद, दु:खाचा खेळ झाल्याची अवस्था शेतकर्यांची झाली आहे. रविवारी (दि. २६) सायंकाळनंतर खेड तालुक्याच्या अनेक भागांत अवकाळी मुसळधार पाऊस झाला. पाऊस येण्याची शक्यता धरून भात उत्पादक शेतकर्यांनी शेतातील काढणीस आलेल्या पिकाच्या काढणीची घाई केली. काही शेतकर्यांनी भाताची झोडणी करून पेंढा शेतात ठेवला. रविवारी पाऊस अचानक सुरू झाला. भात काढून शेतात ठेवलेले पीक भिजल्याने मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.युरोपातून मागणी आहे. शेतकर्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. भाताच्या पेंढ्यांचेही



नुकसान झाले. अनेक ठिकाणी भात पिकात पाणी साचल्याने हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान झाल्याने अनेक शेतकर्यांनी पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी केली. आंबोली परिसरातील अनेक गावांत मुसळधार पाऊस झाल्याने भात खाचरे तुडुंब भरली आहेत. भात पिकानंतर मसुरी, वाटाणा पेरणी केलेल्या पिकांचे त्यामुळे नुकसान होणार आहे. एकीकडे अवकाळी पावसाने भात पिकाला झटका बसला, तर दुसरीकडे रब्बी हंगामात पेरलेल्या गहू, ज्वारी, हरभरा या पिकांना या पावसाने दिलासा मिळाल्याने त्या शेतकर्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. परंतु, ज्यांना पाणी नव्हते ते शेतकरी पावसाची वाट पाहत असताना अचानक पाऊस झाल्याने समाधानी आहेत.

### अजूनही पावसाची शक्यता

**» आंबोली, पाईट, शिरोली, चांदूस, संतोषनगर, पिंपरी, कोरेगाव, कुरकुंडी, करंजविहिरे, गोणवडी, अहिरे, चाकण एमआयडीसी भागातील गावे, शिवे, तळवडे, राक्षेवाडी, होलेवाडी, चांडोली आदी गावांच्या परिसरात जोरदार पाऊस झाला. तालुक्यात अजूनही ढगाळ वातावरण असल्याने पावसाची शक्यता आहे. सोयाबीन काढणीनंतर गहू, हरभरा या पिकांना झालेला पाऊस जीवदान देणारा समाधानकारक झाल्याचे वडगाव पाटोळे येथील शेतकरी किसन नेहेरे यांनी सांगितले.**

# तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी बसस्थानकावर रॅम्प असलेले वाहनतळ उभारा : अजित पवार

## इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग सुविधेचाही समावेश

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र परिसरात निर्माण होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी देहू-आळंदी-पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसरात अत्याधुनिक बसस्थानक बांधून त्याच्यावर रॅम्पची सुविधा असलेले वाहनतळ उभारण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, तीर्थक्षेत्र आळंदी येथे आषाढी वारीसह वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक येतात. आलेल्या भाविकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये यासाठी पुरेशा वाहनतळाची व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. एसटी बसस्थानकांच्या इमारतीवर रॅम्पच्या सुविधेसह पार्किंग उभारण्याचा प्रस्ताव तयार करावा. शिवाय या आराखड्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग सुविधेचाही समावेश करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. बसस्थानक परिसरातील रस्त्यांसाठी एसटी महामंडळाची ६५२ चौरस मीटर जागा प्रस्तावित आहे. त्यासाठी एसटीला जागेच्या मोबदल्याची रक्कम जिल्हा नियोजन समितीमधून देऊन जागा नगरपालिकेला हस्तांतरित करावी, असेही त्यांनी सांगितले. चाकण शहरातील विकासकामांचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पुण्याच्या आजूबाजूला असणाऱ्या नगरपरिषद क्षेत्रातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. देण्यात नगरपरिषदांना मर्यादा येत आहेत. चाकण शहर व परिसराची लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे शहराची हद्दवाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी दिलीप मोहिते पाटील यांनी केली आहे. नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी चाकणच्या हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. हुतात्मा राजगुरू स्मारकाबाबत



बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राजगुरूनगर येथे हुतात्मा राजगुरू यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी २४८ कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्याची अंमलबजावणी करताना पोलीस वसाहतीसाठी आरक्षित जागेच्या ठिकाणी नगरपालिकेची प्रशासकीय इमारत करण्याचा सुधारित आराखडा तयार करून प्रस्ताव सादर करावा. त्याचप्रमाणे पंचायत समितीची जुनी जागा आहे, ती जागाही नगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत निर्णय घेण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणाऱ्या चाकण, राजगुरुनगर, आळंदी येथील एमआयडीसीमधून १० रस्ते जातात, यापैकी तीन रस्ते मंजूर आहेत, तर चार रस्ते एमआयडीसी क्षेत्राबाहेरील असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मावळ-खेड भागातील नागरिकांनी औद्योगिक क्षेत्रासाठी आपल्या जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे या परिसरातील गावांमधील नागरिकांना चांगल्या सोयी देण्यासाठी एमआयडीसी क्षेत्राला जोडणारे रस्ते, पोहोच रस्ते सुस्थितीत असणे आवश्यक आहे. मुख्य रस्ते बनवितानाच पर्यायी रस्त्यांची दुरूस्ती करावी, त्यांची रुंदी वाढवावी. शेतकऱ्यांची मान्यता असल्यास पुणे चक्राकार रोड (रिंग रोड) तयार करताना मरकळ ते गोलेगावदरम्यान सर्विस रोड ९० मीटरऐवजी ११० मीटर करावा. त्यापुढे तो लोणीकंदपर्यंत वाढविण्याबाबत विचार करावा. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादनास मान्यता देण्यात येईल.

### पाण्याची व्यवस्था करावी

» चाकण एमआयडीसीकडे ४२ एमएलडी पाण्याची मागणी येत आहे. परिसरातील सहा ग्रामपंचायतीला एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा होत असून ३० एमएलडी पाणी शिल्लक आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, प्रस्तावित नवीन उद्योगांसाठी पाणी राखीव ठेवून उर्वरित पाण्यामधून गावांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे चाकण, राजगुरुनगर आणि आळंदी या तिन्ही नगरपरिषदेचे घनकचरा संकलन प्रकल्प पूर्णतेच्या मार्गावर आहेत. यापुढे केवळ घनकचऱ्यावर प्रक्रिया न करता या प्रकल्पांमधून वीज, गॅस, बांधकामासाठीचे साहित्य यासारखे उत्पादन घेणारे प्रकल्प राबविण्यात यावेत. देशात नावीण्यपूर्ण कल्पना वापरून घनकचरा प्रकल्प उभारले जात आहेत, अशा प्रकल्पांची माहिती घेऊन यापुढील नवीन प्रकल्प राबविण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

# देहू-आळंदी-पंढरपूरला अत्याधुनिक बसस्थानके!

## राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र परिसरात निर्माण होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी देहू-आळंदी-पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसरात अत्याधुनिक बसस्थानक बांधण्यात येणार आहे. तसेच त्यावर रॅम्पची सुविधा असलेले वाहनतळ उभारण्यात येणार आहे. याशिवाय इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधाही तयार करण्यात येणार आहे. मंत्रालयात आयोजित बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे आदेश दिले. तीर्थक्षेत्र आळंदी येथे आषाढी



वारीसह वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक येतात. आलेल्या भाविकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये यासाठी पुरेशा वाहनतळाची व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. एसटी बसस्थानकांच्या इमारतीवर रॅम्पच्या सुविधेसह वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव तयार करावा. शिवाय या आराखड्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग सुविधेचाही समावेश करण्याची सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. तसेच बसस्थानक परिसरातील रस्त्यांसाठी एसटी महामंडळाची ६५२ चौरस मीटर जागा प्रस्तावित आहे. त्यासाठी एसटीला जागेच्या मोबदल्याची रक्कम जिल्हा नियोजन समितीमधून देऊन जागा नगरपालिकेला हस्तांतरित करावी. देहू-आळंदी-पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसरात अत्याधुनिक बसस्थानक बांधण्यात येईल. त्यावर रॅम्पची सुविधा असलेले वाहनतळ उभारण्यात येणार असल्याचेही पवार यांनी बैठकीत सांगितले.